विशेष  खटला क्र.३५/२०२४
सरकार –वि– कुणालकुमार
निशाणी क्र. ४३

सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३  यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | मोहम्मदलाल बाबू सफीक |
| वय | – | ४५ वर्षे. |
| व्यवसाय | – | मजूरी |
| राहणार | – | वैशाली गाव जिल्हा हसणपूर, राज्य बिहार |

सरतपास सरकारी वकील  श्रीमती सोनाली सावजी  यांचे मार्फत–

०१.  मी फिर्यादीला व आरोपीला ओळखतो. अंदाजे दोन वर्षा आधी ते दोन्ही माझ्यासोबत बुलडाणा येथे डॉ संचेती यांच्या मंगल भवन बांधकामासाठी कामावर होते. त्यावेळेस आम्ही सर्व कामगार बांधकाम ठिकाणीच राहत होतो. घटनेच्या वेळी फिर्यादी हिचा आरोपी याचे सोबत काही पैशाचे कारणावरुन वाद झाला होता. याशिवाय तेव्हा तिचेसोबत कोणतीही घटना झालेली नव्हती. असे घडले नाही की, घटनेचे दिवशी सदर फिर्यादीचा पती बबलूकुमार कचोरी घेण्यासाठी गेला असता, या आरोपीने तिच्यासोबत बळजबरीने बलात्कार केला आणि तिचा आवाज तिच्या पतीने ऐकला. असे झाले नाही की, त्यावेळेस बबलुकूमार याला आरोपी तेथून पळून जात असल्याचे दिसून आला. असे झाले नाही की, मी विचारल्यावर सदरील घटनेबाबत फिर्यादी व तिचे पती बबलूकुमार याने मला सांगितले होते. पोलीसांनी माझे बयाण घेतले नव्हते.

प्रस्तुतचा साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने, सरकारी वकीलांनी साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.
उलटतपास सरकारी वकील श्रीमती सोनाली सावजी यांचे मार्फत.

०२.  हे म्हणणे खरे नाही की, घटनेचे दिवशी फिर्यादीचा पती बबलू कुमार कचोरी घेण्यासाठी गेला असता, आरोपीने तिच्यासोबत बळजबरीने बलात्कार केला व तिचा आवाज तिच्या पतीने ऐकला. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा बबलुकूमार याला असता आरोपी तेथून पळून जात असल्याचे मला दिसून आला. हे म्हणणे खरे नाही की, मी विचारल्यावर सदरील घटनेबाबत फिर्यादी व तिचा पती बबलूकुमार याने मला सांगितले होते. माझे पोलीस बयाणामधील अधोरेखांकीत भाग–अ आता मला वाचून दाखविला. मी असे पोलीसांना सागितले नव्हते. असे माझे बयानात लिहीण्याचे कारण आज मी सांगु

शकत नाही. हे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरीता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. धिरज गोठी यांनी नाकारला.

उलटतपास पुर्ण. फेरतपास काही नाही.

वा.दा.ब. अ.क.क.

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.20 13:58:07 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

समक्ष

ASHOK GURUDASMAL SANTANI
Digitally signed by ASHOK GURUDASMAL SANTANI
Date: 2026.02.20 13:58:17 +0530

(ए. जी. संतानी)
जिल्हा न्यायाधीश क्र. २
बुलडाणा

दिनांक : १८/०२/२०२६.